## मुंबई विद्यापीठ

क्र.युजी/२५४/२०१६-१७

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठ विभागांचे संचालक/ विभागप्रमुख, संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांना असे सुचित करण्यात येते की, प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष कला, वाणिज्य, विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्याची संधी देण्याबाबत विद्वत परिषदेच्या दिनांक २८ फेबुवारी, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला

**बाब क्र. ८.१** : " विद्यापीठ परिपत्रक दि .१ ऑगस्ट, २०१६ अन्वये कला, विज्ञान व वाणिज्य विद्याशाखा प्रथम वर्ष व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना ऑक्टोबर २०१६ च्या परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र, सदर परिपत्रकात तृतीय वर्षाचे अनुत्तीर्ण विद्यार्थी व ऑक्टोबर २०१६ च्या परिक्षेस उत्तीर्ण झालेले प्रथम वर्ष व द्वितीय वर्षातील विद्यार्थी ज्यांना तृतीय वर्षाच्या परिक्षेस सादर व्हायचे आहे, अशा विद्यार्थ्यांबाबत निर्णय घेतलेला नाही. त्या अनुषंगाने ऑक्टोबर २०१६ च्या परिक्षेस प्रथम वर्ष व द्वितीय वर्षाच्या परिक्षेस बसुन, तृतीय वर्षाच्यो परिक्षेस पात्र असलेले व ऑक्टोबर २०१६ च्या परिक्षेस तृतीय वर्षाच्यो परिक्षेत **अनुत्तीर्ण झालेले विधार्थी या सर्वासाठी विशेष बाब म्हणुन एप्रिल/मे २०१७ च्या परिक्षेत शेवटची अतिरिक्त संधी देण्यात यावी, असे ठरले.** तसेच, जे **विधार्थी ऑक्टोबर २०१६ च्या परिक्षेस यशस्वी होणार नाहीत,** त्यांना जुन्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देण्याची संधी पून्हा देण्यात येणार नाही. मात्र, अशा विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमाप्रमाणे परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात यावी, असेही **ठरले.**"

सदर परिपत्रक मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.(www.mu.ac.in).

मुंबई - ४०० ०३२
दि. १० मार्च २०१७

डॉ एम. ए. खान
कुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठ विभागांचे संचालक/ विभागप्रमुख, संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य.

विद्वत परिषद सभा न. ८.१/२८/०२/२०१७

२.